|| सबका मालिक आत्मा ||



# दीपावली

निमित्त

## मन:पूर्वक शुभेच्छा!


आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

||ॐ गुरुदेव||

# आत्मा मालिक

नोव्हेंबर-२०२४

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २३ वे अंक ११ वा नोव्हेंबर २०२४ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

**जनसंपर्क**

पराग धुमाळ (ध्यान योग मिशन कार्यालय)
मो. ७५८८६९४०८४, ८३८००३९३०५

संपादकीय - आत्मानंदाचे प्रकाशपर्व - संत परमानंद महाराज ४

आत्मारामच रावण व मग राम होतो -डॉ. विजय बाणकर ६

पुराण प्रसिद्ध दीपावली - नामदेव सदावर्ते १०

ज्ञानोबा, सांवतोबा, तुकोबांची दिवाळी - डॉ. सुनील शिंदे १४

ज्ञान तेजोमय दीपावली -बंडोपंत कुलकर्णी १६

आत्मस्वरूपाची ओळख -बी. के. गायकवाड १९

- नीता एवं नरेश यादव - नीता एवं नरेश यादव २२

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



संपादकीय

## आत्मानंदाचे प्रकाशपर्व

दिवाळी हा भारतीयांचा सर्वात मोठा, आनंदाचा, समृद्धीचा सण! या सणाचे भौतिक महत्व जेवढे तेवढेच ते अध्यात्मिक पातळीवरही आहे. किंबहुना सर्वच भारतीय सणांना अध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. आपण सगळे दिवाळीमध्ये आनंदी असण्याचा बाह्यस्वरुपात प्रयत्न करतो. मग ह्यावेळेस आपणच आपल्याला विचारू, की मी खरंच दिवाळीची मजा लुटतोय की ही फक्त वरवरची दिवाळी आहे?

-संत परमानंद महाराज

**दि**वाळी हा भारतीयांचा सर्वात मोठा, आनंदाचा, समृद्धीचा सण! या सणाचे भौतिक महत्व जेवढे तेवढेच ते अध्यात्मिक पातळीवरही आहे. किंबहुना सर्वच भारतीय सणांना अध्यात्मिक पार्श्वभूमी आहे. आपण सगळे दिवाळीमध्ये आनंदी असण्याचा बाह्यस्वरुपात प्रयत्न करतो. मग ह्यावेळेस आपणच आपल्याला विचारू, की मी खरंच दिवाळीची मजा लुटतोय की ही फक्त वरवरची दिवाळी आहे? ही दिवाळी खरोखरच साजरी करण्यासाठी, दिवाळीचे अध्यात्मिक महत्व जाणून घेणे खूप गरजेचे आहे.

दिवाळीमध्ये आपण सगळे घरी दिवा लावतो, घरातला सगळा अंधःकार निघून जावा यासाठी. दिवाळी ह्या शब्दामध्येच 'दिवा' आहे. पण ह्या दिव्यामागचे अध्यात्मिक स्वरूप काय? कुठला अंधकार जाण्यासाठी आपण हा दिवा लावतो? घरातील वीज गेली तरीसुद्धा आपण घरी मेणबत्ती लावतो, पण आपण त्याला दिवाळी तर म्हणत नाही ना? मग दिव्याचे इतके महत्व दिवाळीमध्येच का? ह्यामागे सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे हा दिवा जो आपण बाहेर लावतो ते एक प्रतीक आहे, स्वतःमधील आत्मस्मृतीचा दिवा लावण्याचे, स्वतःचे खरे स्वरूप जाणण्याचे.

आपण दररोजच 'आत्मा' हा शब्द ऐकतो, पण बरेचदा आपल्याला माहितच नसते कि आत्मा म्हणजे नक्की काय? आपल्या वेद, पुराणामध्येसुद्धा आत्मा शब्द वापरला गेला आहे, भगवद्गीतेमध्ये सुद्धा आत्म्याची लक्षणे, स्वरूप सांगितले गेले आहे. पण तरीसुद्धा नीट कल्पना नव्हती की आत्मा म्हणजे काय. गुरुदेवांनी या प्रश्नाचे उत्तर संपूर्ण जगाला दिलं आहे. उत्तर एकदम सोप्पे, मीच एक आत्मा आहे, जो शरीरापासून एकदम वेगळा. मी आत्मा राहतो शरीरामध्येच, सगळ्या गोष्टींचा अनुभव पण मीच करतो, पण त्या गोष्टी बाहेर दर्शविण्यासाठी मी आत्मा ह्या शरीराचा वापर करतो. शरीर हे फक्त एक निमित्तमात्र आहे, माझ्या भावना बाहेर दर्शविण्यासाठी. मी आत्मा अतिसूक्ष्म ज्योतीर्बिंदू स्वरूप आहे, जो ह्या शारीरिक डोळ्याने दिसत नाही, पण आपण रोजच अनुभव मात्र करतो. आत्म्याचा मूळ स्वभाव आहे शांती, प्रेम. मी आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे. हे आत्म्याचे ज्योतीर्बिन्दुस्वरूप जाणून घेणे म्हणजेच आत्मस्मृतीची ज्योत लावणे.

आजपर्यंत आपण सगळे स्वतःला एक शरीर मानून चालत आलो. आणि या एका चुकीच्या समजुतीमुळे आजकाल आपण सगळे काहीना काहीतरी दुःख उपभोगत आहोत. रोजच्या भाषेमध्ये मात्र आपण वापरतो आज 'माझा' हात दुखत आहे, आज 'माझे' शरीर दुखत आहे, माझा हात, माझे शरीर, हा 'माझे' म्हणणारा कोण? तोच मी, एक शांतस्वरूप आत्मा. ह्या एका चुकीमुळे आपण रोज

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

किती मानसिक त्रासातून जातो. जेव्हा आपण स्वतःला शरीर म्हणून चालतो तेव्हा तुलना सुरू होते, मी दुसऱ्यापेक्षा जास्त सुंदर किंवा कमी. एका भावनेने अवाजवी आत्मविश्वास तर दुसऱ्या भावनेने न्यूनगंड. दोन्हींमध्ये मानसिक त्रास आहे. अजून एक भय जे सर्वांमध्ये आहे ते म्हणजे मृत्यूचे भय. शरीर जे निर्माण झाले आहे ते नष्ट तर होणारच, पण मी आत्मा अविनाशी आहे. जेव्हा आपण प्रत्यक्षात हे आत्मस्वरूप अनुभव करू लागतो तेव्हा मृत्यूचे भय..? आणि ज्याला मृत्यूचे भय नाही त्याला ह्या जगात अजून कुठलेही भय नाही.

जसा मी एक आत्मा आहे जो ह्या शरीराद्वारे स्वतःला दर्शवितो, तसेच इतर सर्व पण आत्मा आहेत. ते पण आपापल्या शरीराद्वारे स्वतःला व्यक्त करतात. मज आत्म्याचा मूळ स्वभावच आहे शांती आणि प्रेम. मी एक शांतीस्वरूप, शांतीप्रिय आत्मा आहे. जर रोजच्या जीवनामध्ये आपण पहिले तर कळून येईल, रोज कितीही आपण धावपळ केली तरी शेवटी प्रत्येक माणूस शांती शोधतो. त्यासाठी आपण कधीतरी सुट्टीवर जातो, संगीत ऐकतो वगैरे वगैरे. पण पुन्हा ह्या सगळ्या गोष्टी शांती बाह्यस्वरुपात शोधण्यासाठी आपण करतो. पण जेव्हा मला हे जाणवते की मी स्वतःच शांतस्वरूप आहे, तर परिस्थिती कुठलीही असू दे मी माझी शांती ढळू देणार नाही. त्याचप्रमाणे, प्रेम हे प्रत्येक आत्म्याला हवे असते. आपण नात्यांमध्ये पण त्याच कारणांसाठी येतो. नाती बनतातच प्रेमाची देवाण-घेवाण करायला. पण तरीसुद्धा आजकाल दिसून येईल की कुठे न कुठेतरी नात्यांमध्ये दुःख अनुभवायला येते. जर खरंच प्रेम हे माझे स्वरूप आहे, तर मग मी कुणाला कधीही दुखवू शकतो? जर ह्या स्वतःच्या मूळ स्वरुपाची आणि स्वभावाची जाणीव झाली आणि ती रोजच्या जीवनामध्ये आणली तर आपले सगळे संबंध किती सुखावह होतील. हे आत्मस्वरूप जाणून घेणे आणि शांती आणि प्रेमाचा स्वभाव कधीही ढळू न देणे, कुठल्याही परिस्थितीमध्ये, हेच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरे करण्यासारखे आहे.

आपण दिवाळीमध्ये जो दिवा लावतो तो मातीचा असतो. त्यामध्ये आपण वात लावून, थोडे तेल टाकून मग दिवा लावतो. ह्या मातीच्या दिव्यामागे, वातीमागे आणि तेलामागेसुद्धा अध्यात्मिक कारण आहे. मातीचा दिवा (पणती) हे प्रतीक आहे ह्या शरीराचे. आपले शरीर बनले आहे मातीपासून (पाच तत्वांपासून). वात ही जशी पणतीमध्ये असते पण तरीही पणतीपासून वेगळी. त्याचप्रमाणे मी आत्मा ह्या शरीरामध्येच असतो पण तरीही शरीरापासून वेगळा. पण त्या वातीवर दिवा लावायलासुद्धा तेल हे लागतेच. आणि हे तेल आहे ज्ञानाचे प्रतीक. मी कोण?, परमात्मा कोण? हे सृष्टीचक्र म्हणजे तरी काय? ह्याचे ज्ञान मिळविणे हेच प्रतीक आहे ह्या तेलामागे. जेव्हा तेल नसते तेव्हा ज्योत लागू शकत नाही आणि प्रकाश पडू शकत नाही. आज बहुतांशी लोकांना हे ज्ञानरूपी तेल न मिळाल्याने बहुतांशी व्यवहार अंधाकारातच होतात आणि म्हणूनच आजकाल आपण आपल्या संबंधामध्ये दुःख उपभोगतो. जेव्हा मला हे आत्मास्मृतीचे ज्ञान होईल आणि ते मी रोजच्या व्यवहारामध्ये दर्शवीन तेव्हाच माझे जीवन मी अधिक सुखकर करू शकेन.

तर ह्या दिवाळीला आपण सगळे जण खऱ्या अर्थाने, आत्मस्वरूपी दिवा लावून दिवाळी साजरी करूयात. एकमेकांना शांती आणि प्रेम देवून, एकमेकांना आत्मस्वरुपात पाहून, एका नवीन वर्षाची वाटचाल सुरू करूयात. मग आयुष्यातील मिठास एकदम वाढेल, दिवाळीतल्या मिठाईसारखी. दिवाळीत सद्गुरूंचे ध्यान करीत आत्म्याला परमानंदाची अनुभूती देऊया. आत्मा मालिक.

**- संत परमानंद महाराज,**
संपादक

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**



## आत्मारामच रावण व मग राम होतो

पूर्वी राम कोणी एक अवतरला, त्याने समुद्र उल्लंघून रावण मारिला, हे आपल्याला कोणाकडून तरी किंवा एखादा ग्रंथ वाचून किंवा टी. व्ही. वरील मालिकेत पाहून माहीत होत असते. श्रीरामांचे चरित्र भक्तिभावाने ऐकून, वाचून वा पाहून त्यांच्याविषयीची शाब्दिक माहिती मिळविणे व माहिती असणे हे परोक्ष (अप्रत्यक्ष) ज्ञान होय; ते अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान नव्हे! म्हणूनच संतांच्या मतें, ते अध्यात्म नव्हे; तर, देह, मन, बुद्धी, वय, वर्ण, जात, कुल वगैरेंबाबत आपल्या ठिकाणी असलेल्या अहंकाराचा (अभिमानाचा) म्हणजे तादात्म्यभावाचा वध करून आपण स्वत: राम म्हणजे आत्माराम आहोत, असा अनुभव घेणे म्हणजे अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान वा खरे अध्यात्म होय.

-डॉ. विजय बाणकर

१.

**''इफ आय कॅनॉट बी राम, देन आय वुड बी रावण;**
**फॉर ही इज द डार्क साईड ऑफ विष्णू.''**

(महायोगी श्रीअरविंद घोष)*

२.

**''उच्चतम माणसापासून नीचतम, दुष्ट अशा माणसापर्यंत, सर्वश्रेष्ठ मानवापासून पायाखाली सरपटणाऱ्या कीटकापर्यंत, प्रत्येकात तोच शुद्ध, पूर्ण,**
**अनंत आणि आनंदस्वरूप आत्मा वसत आहे. कीटकामध्ये त्या आत्म्याच्या**
**शक्तीचा व शुद्धतेचा अत्यल्प अंश अभिव्यक्त होतो, आणि सर्वश्रेष्ठ पुरुषात**
**त्याचा बराच मोठा अंश प्रकट होतो. या दोहोंमधील भेद फक्त**
**अभिव्यक्तीच्या प्रमाणात आहे, त्यांच्या मूल स्वरूपात काहीच भेद नाही.**
**अखिल भूतमात्रांत तोच शुद्ध आणि पूर्ण आत्मा वास करतो.''**

(स्वामी विवेकानंद)*

पूर्वी राम कोणी एक अवतरला, त्याने समुद्र उल्लंघून रावण मारिला, हे आपल्याला कोणाकडून तरी किंवा एखादा ग्रंथ वाचून किंवा टी. व्ही. वरील मालिकेत पाहून माहीत होत असते. श्रीरामांचे चरित्र भक्तिभावाने ऐकून, वाचून वा पाहून त्यांच्याविषयीची शाब्दिक माहिती मिळविणे व माहिती असणे हे परोक्ष (अप्रत्यक्ष) ज्ञान होय; ते अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान नव्हे! म्हणूनच संतांच्या मतें, ते अध्यात्म नव्हे; तर, देह, मन, बुद्धी, वय, वर्ण, जात, कुल वगैरेंबाबत आपल्या ठिकाणी असलेल्या अहंकाराचा (अभिमानाचा) म्हणजे तादात्म्यभावाचा वध करून आपण स्वत: राम म्हणजे आत्माराम आहोत, असा अनुभव घेणे म्हणजे अपरोक्ष (प्रत्यक्ष) ज्ञान वा खरे अध्यात्म होय.१

हे ज्ञानी व्यक्तीला ठाऊक असते, अशी सुरुवात करून श्रीराम सूर्यवंशीं जन्मला होता तसा आपला जीव आता नरदेहीं जन्मला आहे, परमेश्वरप्राप्तीसाठीचे सर्वश्रेष्ठ साधन असलेला मानवदेह आता आपल्याला मिळालेला आहे, हे लक्षात घेऊन व सदैव लक्षात ठेवून श्रीरामचरित्रातील काही ठळक गोष्टींपासून आता आपल्याला नेमका कोणता बोध घ्यावयाचा आहे व आपल्याला आपले व परमेश्वराचा सातवा अवतार म्हणून

होऊन गेलेल्या प्रभु श्रीरामांचेही मूळ स्वरूप प्राप्त होण्यासाठी आता आपण नेमके काय करावयास हवे, ते श्रीहंसराजस्वामी यांनी 'वेदेश्वरी' या ग्रंथात उपदेशिले आहे.२

श्रीरामचरित्राचे निर्हेतुकपणे व निरहंकारपणे अनुसरण करतात ते रामच होऊन जातात, असे नि:श्रेयस्कर म्हणजे परमकल्याणकारी उपदेशवजा विधानही त्यांनी सदर 'अध्यात्मरामायण'नामक निरुपणान्तीं केले आहे.३ अखंडित सोऽहं जप करून तू रामरूप हो, असे संत श्रीनामदेव यांनीदेखील स्वमनाला सांगत अप्रत्यक्षपणे आपल्या सर्वांनाही उपदेशिले आहे.४

यापूर्वीच्या एका लेखात, मानवदेहस्थित आत्मा हाच श्रीराम म्हणजे परमेश्वर होय व त्याची पूजा करण्याचे सर्वश्रेष्ठ देवनिर्मित मंदिर असलेला मानवदेह ही अयोध्या होय, असा सर्वच संतांचा अंतिम निर्णय असल्याचे आपण समजून घेतले आहे.

आता या लेखात, देहरूपी अयोध्येत स्वस्वरूपत: (म्हणजे मुळात) रामच असलेले आपण आधी रावण कसे होतो व नंतर पुन्हा राम कसे होत असतो वा कसे होऊ शकतो, ते श्रीहंसराजस्वामीलिखित 'वेदान्तकाव्यलहरी'मधील 'रामच रावण कसा होतो' या शीर्षकाच्या पुढील काव्याधारे समजून घेण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत -

**'राम अधीक अहंता, रावण बेरीज येतसे पाही।**
**रावण उणे अहंता, बाकी श्रीराम संशयो नाही।।१।।**
**देह-अयोध्या नगरीं वसतो हृदयाभिराम श्रीराम।**
**सीता ही निजशांती, अर्धांगी रामपत्नि निष्काम।।२।।**
**इंद्रिय ग्रामीं राहुनि देव करिती रामसेवेला।**
**पंचक अंत:करणीं त्यापरि राहोनि करिति कार्याला।।३।।**
**घ्राणेंद्रियांत अश्विनिकुमार, जिव्हेंद्रियांत वरुण वसे।**
**नेत्रेंद्रियांत रवि, त्वक्इंद्रियग्रामांत वायु राहतसे।।४।।**
**श्रोत्रिंद्रियीं दिशा, गुदइंद्रियग्रामांत यम करी काम।**
**शिश्नेंद्रियीं प्रजापति, पादेंद्रियीं देवता उपेंद्र सम।।५।।**
**पाणींद्रियांत राही इंद्रच, वागींद्रियांत तो अग्नी।**
**बाह्येंद्रियकर्मासी चालविती, सकल देव राबोनी।।६।।**
**अंत:करणीं विष्णु, चंद्र मनामधिं, तसाच बुद्धींत।**
**ब्रह्मा, चित्तांत वसे नारायण, रुद्र तो अहंतेत।।७।।**
**निरहंकारें चाले जोंवरि हे देहकर्म सहजीच।**
**तोंवरि श्रीरामाचे चाले साम्राज्य समज रे साच।।८।।**
**सहजपणा मोडोनी, 'मी या देहास राबवी' ऐसा।**
**अभिमान उठे तैं, तो रामचि रावण बने पहा कैसा।।९।।**
**रामचि रावण होतां, हरण करी शांतिधाम ती सीता।**
**सीताशोधन रडुनी राम करी, शोकमग्न होत्साता।।१०।।**
**जीवचि शिव; परि झाला जीव अहंतेमुळे असा भिन्न।**
**संसारताप भोगी, स्वानंदसुखासि अग्नि लावून।।११।।**
**एक अहंता निमतां, रावण तो राम, जीव तोचि शिव।**
**उभयांत भेद नाही, भेद दिसे काल्पनीक तो भाव।।१२।।'**

श्रीहंसराजस्वामी म्हणतात, की अहंतायुक्त असणे म्हणजेच रावण होणे होय. मूलत: आत्माराम

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

असलेला जीव हा स्थूल देहाभिमानी होऊन वागत असतो तेव्हा तो जणू रावण होऊनच वागत असतो, असे यातून त्यांनी सूचित केले गेले आहे. याउलट, स्थूल देहाचा अभिमान बाळगून रावण झालेली व्यक्ती जेव्हा (देह, मन, बुद्धी, जीव यांबाबतची) अहंता नि:शेषपणे म्हणजे पूर्णपणे सोडते तेव्हा ती पुन्हा राम होत असते, हे नि:संदिग्ध सत्य होय. (श्रीहंसराजस्वामीकृत या  विधानास, 'आत्माराम व अहंरावण' तसेच 'दशेंद्रिये म्हणजे दशमुख', 'देहअहंकृती रावण' आणि 'अहंकार कांपिन्नला। तो (रावण) श्रीरामां शरण आला। तद्रूपतेचा कौल घेतला। सोऽहं झाला श्रीराम।।', या संत श्रीएकनाथकृत 'भावार्थरामायणाच्या' युद्धकांडात असलेल्या सूचक म्हणजे अध्यात्माच्या वर्मविषयक उल्लेखांमुळे तसेच रावणाच्या स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चारही देहांचे निरसन होऊन त्यास रामस्वरूप (सर्वव्यापक आत्मारामत्व) प्राप्त होते व तो कृतार्थता पावतो, अशा अर्थाच्या वेदसंमत सिद्धान्तयुक्त विस्तृत विवरणात पुष्टी मिळते.)५

देहरूपी अयोध्येत सर्वत्र एक आत्मारामच नांदत आहे म्हणजे देहाचा कण न् कण हा मुळात आत्मारामच आहे, असे अनुभवास आले की देहातील सर्व तत्त्वांमध्ये (उदा. जल व अग्नि यांमध्ये) पूर्वी होता तो वैरभाव लय पावतो. परिणामी देहच अयोध्या आहे म्हणजे देहात कुठेही कशाचेही कशाशीही युद्ध चाललेले नाही, अशी अखंड स्वस्वरूपस्थिती (परब्रह्मस्थिती) अनुभवास येते. असे अनुभवास येणे म्हणजे निजशांती लाभणे होय. निजशांती हेच सीतेचे खरे रूप होय. सर्व इच्छाआकांक्षा पूर्ण झालेल्या असणे म्हणजे पूर्णकाम असणे होय. आपले मूळ स्वरूप सर्वव्यापक एक आत्मा आहे असे सानुभव ज्ञान झालेली व्यक्ती पूर्णकाम असते. अर्थात ती पूर्णकाम आत्माराम असते. पूर्णकाम आत्माराम व त्याची अर्धांगिनी निजशांतीरूप निष्काम सीता हे एकमेकांहून कधीही वेगळे नसतात. फक्त पूर्णकाम किंवा पूर्णत: निष्काम जीवच शांत राहू शकतो. याउलट, सकाम जीव देहाभिमानी होऊन कामक्रोधादि सहा विकारांच्या आहारी जातो, रावणासारखा सकाम होऊन बिनदिक्कत स्वैराचार करू लागतो, तो स्वत:च स्वत:ची शांती हरण करतो व नंतर शोकमग्न होऊन तिला शोधीत राहतो.

सदर काव्यातील यानंतरच्या क्रमांक तीन ते सात या कडव्यांमध्ये श्रीहंसराजस्वामी यांनी, इंद्रियग्रामामध्ये म्हणजे देहरूपी अयोध्येत राहून विविध इंद्रियाधिष्ठात्री देव आत्मारामरूपी देवाधिदेवाची कशी सेवा करीत असतात, त्याचे वर्णन केले आहे. नाकात अश्विनीकुमार, जीभेत वरुण, डोळ्यांत रवी, त्वचेत वायु, कानात दिशा, गुदेंद्रियांत यम, लिंगात प्रजापती, पायात उपेंद्र, हातात इंद्र, वाचेत अग्नि हे सारे देव पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये या बाह्य दहा इंद्रियांचा कारभार चालवीत असतात; तर, अंत:करणात विष्णु, मनात चंद्र, बुद्धीत ब्रह्मा, चित्तांत नारायण व अहंकारात रुद्र हे देव देहाधीश असलेल्या आत्मारामाची सेवा करीत राहिलेले असतात.६

जोपर्यंत देहाचा कारभार निरहंकारपणे व सहजपणे चालविला जात असतो म्हणजे अमुक एक गोष्ट मी करीलच किंवा करणारच नाही अशा अभिमानयुक्त विचाराचा स्पर्शही अंत:करणाला न होतां तो चालविला जात असतो तोपर्यंतच देहात श्रीरामाचे साम्राज्य (रामराज्य चालू) असते. अहंकाराच्या वाऱ्याचा किंचितही स्पर्श होत नाही अशी स्थितीरूप सहजता (सहजभाव) सोडून जेव्हा मीच या देहाचा मालक आहे व मी माझ्या देहाला व पर्यायाने देहातच (तीन ते सात या कडव्यांमध्ये उल्लेखिल्या आहेत त्या) अतिसूक्ष्मरूपाने वास करीत असलेल्या विविध इंद्रियाधिष्ठात्री देवांना बंदी बनवून रावण जसा राबवीत होता तसा मीही माझ्या मनात येईल तसा माझ्या पाच ज्ञानेंद्रियांना  व पाच कर्मेंद्रियांना (म्हणजे पर्यायाने त्या देवतांना) राबवीन, असा अहंकारयुक्त भाव जीवाच्या ठिकाणी येतो व तो फक्त विषयासक्त होऊन जगत राहतो तेव्हा तो देहाधीश आत्मारामच (म्हणजे त्याचा अंश असलेला जीवच) रावण झालेला असतो. अशाप्रकारे केवळ दशेंद्रियांचा स्वैर वा मनमानी कारभार करणारा रामच रावण होत असतो व शांतिधामरूपी सीतेचे स्वत:च कळततनकळत

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

हरण करून बसतो म्हणजे शांतिधामरूपी सीतेला तो स्वत:च मुकत असतो. (हेच सन्मार्गदर्शक व हितोपदेशयुक्त सत्य 'मनोमार्गें गेला तो तेथें मुकला। हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य।।', या संत श्रीज्ञानदेवकृत हरिपाठातील अभंगविधानात७ अनुस्यूत आहे, असे समजून घ्यावयास हरकत नसावी.)

यानंतरच्या क्रमांक अकरा व बारा या कडव्यांमध्ये श्रीहंसराजस्वामी यांनी सदर काव्याचे व पर्यायाने अध्यात्मशास्त्राचे सार सांगितले आहे. जीव हा मुळात शिवच म्हणजे आत्मारामच असतो. पण 'मी देह आहे' असा अभिमान बाळगून तो स्वत:ला वेगळा समजू लागतो. मुळात आत्मारामच असलेला तो ज्या अहंतेमुळे रावण होतो व आपल्या स्वानंदसुखाला आग लावून संसाराचा ताप भोगत राहतो, ती अहंता निमली म्हणजे पूर्णत: लय पावली की रावण झालेला तो मी आत्मारामच आहे व आत्मारामच होतो, असे अनुभवू लागतो.

थोडक्यात, जीव हा रामाशी अभिन्न असलेला शिवच आहे, जीव व शिव यांच्यात काहीही भेद नाही. तरीपण, जो भेद दिसतो तो काल्पनिक भाव आहे की जो अहंकार सोडून दिल्यावर लय पावतो व सर्वत्र एक रामच असल्याचे सदोदित होते, म्हणजे खऱ्या अर्थाने रामराज्य प्रस्थापित होते.

* * * * *

**संदर्भ व टिपा :**

(१) पृष्ठ क्र.४१, थॉट्स अँड फॉरिझम्स, श्री अरबिंदो आश्रम पब्लिकेशन डिपार्टमेंट, पाँडिचेरी, थर्ड इंप्रेशन (१९९२); (२) पृष्ठे क्र.५१-५२, आत्मतत्त्व; प्रकाशक रामकृष्ण मठ, धंतोली, नागपूर - ४४००१२ (२००१)

०१. अ) खरे संत व सद्गुरूच हे अपरोक्ष ज्ञान शिष्याला देत असतात व त्याला तूच आत्माराम आहेस असे अनुभवास येण्यासाठीचे मार्गदर्शन करतात, असे संत श्रीएकनाथ यांनी पुढील अभंगातून स्पष्ट केले आहे : 'सद्गुरू तोचि जाण। जो अपरोक्ष सांगे ज्ञान। देहत्रय निरसून। परमपदीं ठेवी।।१।। जेणें देहत्रय निसिले। ज्ञानअग्नीमाजी जाळिले। अच्युतपद प्राप्त केले। त्यासी वेळ नाही।।२।। निराकार निरामय। निर्भय ते अद्वय। तयामाजी लिंगदेह। मरूनिया गेले।।३।। एकाजनार्दनीं प्राप्ति। जैं लिंगदेहाची होय शांति। मग सायुज्यमुक्ति। पायां लागे।।४।।'; ब) 'रजोगुणरूप रावण विवेकरूप रामाची ब्रह्मविद्यारूप सीता हरण करतो. हा राम अमानित्वादि तसेच अतिकृपालुतादि दैवी गुणरूप वानरांच्या सेनेसह विचाररूप सेतू बांधून अंत:करणरूप लंकेला जाऊन सत्त्वगुणरूप बिभीषणाचे सहाय्य घेऊन तमोगुणरूपी कुंभकर्णासहित दंभादि आसुरी सेना व रजोगुण अविवेकरूप रावणास मारतो,' असे 'अनुभवप्रकाश' या ग्रंथातही म्हटले आहे. (पुष्कर प्रकाशन, १८८६, सदाशिव पेठ, नातूबाग, पुणे-४११०३०)

२. यासाठी पहा लेखकाच्या 'कबीरविचार' या पुस्तकातील 'राम जाणिला तेणें जाणिला सकळ शास्त्रविचार!' या लेखातील संबंधित मार्गदर्शक विवेचन. प्रकाशक : विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे - ४११०३७ (मार्च २०२४);

०३. पहा वेदेश्वरी, अध्याय क्र. ५, ओव्या क्र. ४२० ते ४६९;

०४. श्रीनामदेव अभंग : धरी रे मना;

०५. पहा युद्धकांड, अनुक्रमे अध्याय क्र.६१ मधील ओवी क्र. ३२; अध्याय ६३मधील ओवी क्र. १० व १५७ आणि अध्याय क्र. ६२मधील ओवी क्र. ३८ व ८८.

०६. अधिक तपशीलांसाठी पहा उपरोक्त लेखकाच्या 'कबीरविचार'नामक पुस्तकामधील 'आपल्या देहातही कोट्यवधी देवदेवतादी आहेत' या शीर्षकाचा लेख क्र.१३.

०७. पहा अभंग क्र. १८

**- डॉ. विजय बाणकर,**
मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस),
पुणे - ४११०२४, (९३२५५८८०९५)

✻✻✻

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## पुराण प्रसिद्ध दीपावली

**अश्विन वद्य त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' धन्वंतरी जयंती साजरी करतात. धन व आरोग्य संपन्नतेसाठी धन व धन्वंतरी पूजन करतात. अश्विन वद्य चतुर्दशीला 'नरकचतुर्दशी 'म्हणतात. या दिवशी सत्यभामासह श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केल्याची स्मृती म्हणून पहाटे अभ्यंगस्नान करण्याची प्रथा आहे. अश्विन अमावास्येला घरावर विद्युत रोषणाईसह पणत्यांची आरास केली जाते. आकाशकंदील लावतात. सायंकाळी सुमुहूर्तावर लक्ष्मी, वही, लेखनसाहित्य, ग्रंथ यांचे पूजन करून आनंदाने फटाके उडविण्याची प्रथा आहे. घरात आरोग्यासाठी स्वच्छता निर्माण करणाऱ्या केरसुणीचीही पूजा या दिवशी करतात. पंचपक्वानांसह दिवाळी फराळाचा नैवेद्य करतात.**

**-नामदेव सदावर्ते**

**जी**वनात प्रकाश, आनंद, समृद्धी व ऐक्य निर्माण करणारा 'दिवाळी 'हा सण. अश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुद्ध व्दितीया असा सहा दिवस चालणारा हा सण आपल्या हिंदुस्थानात अनादिकालापासून साजरा करतात. वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, अमावस्येला लक्ष्मीकुबेर पूजन करण्यात येते. यास दिवाळी, दीपावली म्हणतात. नंतर कार्तिकात बलिप्रतिपदा पाडवा व दुसऱ्या दिवशी भाऊबीज हे सण येतात. ग्रंथराज ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी अनेक ठिकाणी दिवाळी या सणाचा उल्लेख केला आहे.

**सूर्ये अधिष्ठिली प्राची।**<br>**जगा राणीव दे प्रकाशाची।**<br>**तैसी वाचा श्रोतयां ज्ञानाची।**<br>**दिवाळी करी।।१५.१२**

दिवाळीच्या सहा दिवसांपैकी वसुबारसेला 'गोवत्स द्वादशी' म्हणतात. या दिवशी श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत करंगळीवर उचलून गोकुळवासीयांचे, गायीवासरांचे रक्षण केले, गोवर्धन पूजा केली. त्याचे स्मरण म्हणून या दिवशी श्रीकृष्ण, गाय-वासराचे पूजन करतात.

अश्विन वद्य त्रयोदशीला 'धनत्रयोदशी' धन्वंतरी जयंती साजरी करतात. धन व आरोग्य संपन्नतेसाठी धन व धन्वंतरी पूजन करतात. अश्विन वद्य चतुर्दशीला 'नरकचतुर्दशी' म्हणतात. या दिवशी सत्यभामासह श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केल्याची स्मृती म्हणून पहाटे अभ्यंगस्नान करण्याची प्रथा आहे. अश्विन अमावास्येला घरावर विद्युत रोषणाईसह पणत्यांची आरास केली जाते. आकाशकंदील लावतात. सायंकाळी सुमुहूर्तावर लक्ष्मी, वही, लेखनसाहित्य, ग्रंथ यांचे पूजन करून आनंदाने फटाके उडविण्याची प्रथा आहे. घरात आरोग्यासाठी स्वच्छता निर्माण करणाऱ्या केरसुणीचीही पूजा या दिवशी करतात. पंचपक्वानांसह दिवाळी फराळाचा नैवेद्य करतात.

कार्तिक महिन्यात बलिप्रतिपदा, भाऊबीज, वैकुंठचतुर्दशी, त्रिपुरारी पौर्णिमा तसेच संत नामदेव महाराज जयंती, गुरुनानक जयंती, काळभैरव जयंती व संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा दिन हे सण, उत्सव, व्रत येतात, भगवान श्री वामनाने बळीराजाच्या दातृत्वाने प्रसन्न होऊन कार्तिक शुद्ध

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

प्रतिपदेला लोक तुझी पूजा करतील असा आशीर्वाद दिला. म्हणून दिवाळी पाडव्याला बलिप्रतिपदा म्हणतात. श्रीरामचंद्रांना याच दिवशी शुभमुहूर्तावर राज्याभिषेक झाला. श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत धारण केल्यानंतर सात दिवसांनी म्हणजेच कार्तिक शुद्ध प्रतिपदेला इंद्र भगवान श्रीकृष्णास शरण आले. उज्जैनचा राजा विक्रमादित्य याने या दिवसापासून विक्रम संवत्सरास प्रारंभ केला. दिवाळीनंतर येणारा हा पाडवा साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक आहे.

बळीला पाताळात घालून देवांची मुक्तता करणाऱ्या भगवान वामनाच्या पराक्रमाची आठवण म्हणून बलिप्रतिपदेला खूप महत्व प्राप्त झाले आहे. व्यापारी नवीन वर्ष प्रारंभ करतात. या दिवशी पत्नीने पतीस ओवाळावे व पतीने तिला सप्रेम भेट देणे अशी प्रथा आहे. कार्तिक शुद्ध द्वितीयेला 'भाऊबीज' हा सण असतो, याच दिवशी यम आपली बहीण यमीच्या घरी जेवणास गेला, तेव्हा यमीने त्याला पंचारतीने ओवाळले. त्याची स्मृती म्हणून आजही प्रत्येक भावास बहीण ओवाळते व भाऊ आपल्या बहिणीस काही भेटवस्तू देतो. असा हा सण भाऊबीज साजरा करण्यात येतो. हरी व हर ही दोन रूपे असली तरी आत्मतत्वाने अद्वैतच आहेत, हा दिव्य संदेश देण्यासाठी भगवान श्रीविष्णूंनी वैकुंठ चतुर्दशीच्या दिवशी काशीला जाऊन कमलपुष्पांनी श्रीशिव शंकरांची पूजा केली. पूजेसाठी त्यांनी एक हजार कमलपुष्पे आणली होती. पण पूजा वाहताना एक कमलपुष्प कमी पडल्याने त्यांनी आपले नेत्रकमल शिवाला अर्पण केले. श्रीविष्णूची भक्ती पाहून श्रीशंकरांनी प्रसन्न होऊन त्यांना सुदर्शन चक्र दिले. जो माझ्या आधी श्रीविष्णूची पूजा करील त्याला वैकुंठप्राप्ती होईल, असा आशीर्वाद दिला. ही मंगलघटना कार्तिक शुद्ध चतुर्दशीला घडली, म्हणून त्या दिवसाला वैकुंठ चतुर्दशी म्हणतात. यावेळी श्रीविष्णू व शिवाची एकत्र पूजा करून शिवाला तुळस व विष्णूला बेल वाहतात. त्यास हरि-हर भेट म्हणतात.

भगवान शंकरांनी कार्तिक शुद्ध पौर्णिमेस त्रिपुरासूर या राक्षसास ठार मारले म्हणून या दिवसाला त्रिपुरारी पौर्णिमा म्हणतात. देव व प्रजा आनंदले. सर्वांनी शिवपूजा केली. या दिवशी ७५० वाती लावून श्रीशंकरांची आरती करतात. असुरांपासून सुरक्षित राहण्यासाठी देव आवळ्याच्या झाडाखाली राहिले. म्हणून आजही त्या आरोग्यप्रदान करणाऱ्या आवळा वृक्षाची पूजा करतात. या त्रिपुरी पौर्णिमेस कार्तिकस्नान व चातुर्मास व्रताची सांगता करतात. सूर्योदयापूर्वी उठून स्नान, पूजा-आरती केल्याने प्रकृती आरोग्य संपन्न राहते म्हणून कार्तिकस्नान व्रताचे महत्व आहे. शके १३९१ च्या कार्तिक शु. पौर्णिमेस शिखधर्माचे आद्यगुरू श्रीगुरुनानकदेवांचा जन्म झाला. भारतभर गुरुनानक जयंती साजरी होते. नाम-गान, दान, नित्यस्नान, सेवा व अखंड प्रभूस्मरण ही पंचतत्वे त्यांनी सांगितली. सर्वभेदभाव नाहिसा करण्यासाठी लंगर, स्नेहसहभोजन सुरू केले. शीख धर्मग्रंथ ग्रंथसाहेब याची सुवर्णमंदिरात स्थापना केली व 'ग्रंथपठण हीच पूजा' असा आदेश दिला. या ग्रंथात महाराष्ट्र वारकरी संप्रदायातील संत नामदेवांची ६१ अभंगपदे आहेत. कार्तिक वद्य चतुर्थीला करवा चौत हे व्रत स्त्रिया करतात. पतीच्या आयुष्य वर्धनासाठी सौभाग्यवती स्त्रियांनी हे व्रत करण्याची प्रथा आहे. पांडव वनवासात असताना अस्त्रप्राप्तीसाठी अर्जुन नीलगिरी पर्वतावर तपश्चर्येसाठी गेला असताना पांडवासह द्रौपदीस अर्जुनाची काळजी वाटू लागली. तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी द्रौपदीला हे व्रत सांगितले. या दिवशी स्त्रिया उपवास करतात. शिवपार्वती, गणेश, कार्तिकेय व चंद्र या देवतांची पूजा करतात. चंद्र उगवल्यावर चंद्र व पत्नी यांच्या मध्ये पतीने उभे राहून चाळणीतून पतीचे मुखावलोकन करण्याची प्रथा आहे. त्यानंतर पतीच्या हातून प्रसाद घेऊन उपवास व्रताची सांगता करतात.

कार्तिक वद्य अष्टमीस काळभैरव जयंती असते. ह्यास दुष्टाचे दमन करणारा, पापक्षालन करणारा

मानतात. काळभैरवाच्या निर्मितीची कथा अशी आहे. एकदा सुमेरू पर्वतावर सर्व देव एकत्र जमले असताना त्यांच्या दर्शनास सर्व ऋषीमुनी आले. जमलेल्या देवांत सर्वश्रेष्ठ कोण, अशी चर्चा सुरू झाल्यावर ब्रह्मदेव व विष्णू

भांडू लागले. त्या दोघांनाही क्रोध आला. त्यातून एक तेज निर्माण झाले व एक बालक प्रगटले. त्याच्या हातात त्रिशूळ होता. ते लहान मूल सर्वांना काळ वाटू लागले. त्याला सर्व काळभैरव असे म्हणून वंदन करू लागले. श्रीशंकराच्या अंशापासून त्याची निर्मिती झाली. त्याचे वाहन कुत्रे आहे. काशीला गेल्यावर भक्त सर्वप्रथम काळभैरवाचे दर्शन घेऊन काळा गंडा बांधतात. प्रत्येक महिन्याच्या वद्य अष्टमीस काळभैरवाची पूजा करतात. शिवाने काशी नगरीचे रक्षण करण्याचे काम काळभैरवावर सोपविले अशी कथा आहे.

शके ११९२ कार्तिक शुद्ध एकादशीला रविवारी सूर्योदयी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भक्त शिरोमणी नामदेव महाराज यांचा जन्म झाला, म्हणून कार्तिक शुद्ध एकादशीला संत नामदेव जयंती साजरी करतात. भारतीय लोकजीवनात समता, एकता, सगुणभक्ती प्रस्थापित करण्याचे महान कार्य इसवी सनाच्या तेराव्या शतकात नामदेवांनी केले. नामदेवकालीन समाजजीवन धर्मप्रधान होते. धर्मातून निर्माण झालेल्या रुढी व कर्मकांडाचे मोठे प्रस्थ त्या काळात माजले होते. नामभक्तीचे सोपे वर्म सांगून नामदेवांनी मानवताधर्म जागवला. महाराष्ट्रातील आद्य पद्य चरित्रकार म्हणून संत नामदेव ओळखले जातात. त्यांनी लिहिलेली संतचरित्रे रसाळ आहेत. संत ज्ञानदेवादि चारी भावंडांच्या समाधी सोहळा प्रसंगाचे अभंग करुणरसप्रधान आहेत. प्रेमरव भक्तिरसांनी तुडूंब भरून वाहणारी नामदेवांची अभंगसरिता मोक्षदायिनी असून, त्यांची अभंगवाणी अमृताहूनही गोड आहे.

शके १२१५ कार्तिक वद्य त्रयोदशीला माध्यान्हसमयी आळंदी येथे संत ज्ञानेश्वरांनी संजीवन समाधी घेतली. त्यानिमित्त आळंदी येथे समाधी सोहळा दिन साजरा होतो. महाराष्ट्रातून लाखो वारकरी माऊलींचा जयघोष करीत आळंदीस पायी दिंडीने येतात. मराठी भाषेवर व महाराष्ट्रधर्मावर माऊलीचे अनंत उपकार आहेत. माऊलीने हरिपाठ, भावार्थदीपिका अर्थात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी व हजारो अभंग मराठी भाषेत रचून ती समृद्ध केली. संस्कृतातील गीतेवर त्यांनी नऊ हजार बत्तीस ओव्यांचा मराठी ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ मराठी भाषेचे वैभव आहे. मराठी माणसाने जीवनभरात एकदा तरी हा ग्रंथ वाचावा. संत नामदेव या ग्रंथाचे वर्णन करताना म्हणतात-

**ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।**
**जेणे निगमवल्ली प्रगट केली।।१।।**
**गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी।**
**ब्रह्मानंद लहरी प्रगट केली।।२।।**
**अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप।**
**चैतन्याचा दीप उजळीला।।३।।**
**छप्पन्न भाषेचा केलासे गौरव।**
**भवार्णवी नाव उभारिली।।४।।**
**श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी।**
**सामराज्य भुवनी सुखी नांदे ।।५।।**
**नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**एक तरी ओवी अनुभवावी ।।६।।**

ज्ञानेश्वरीत त्यांनी सद्‌गुरूंकडे मागितलेले पसायदान विश्वप्रार्थना मानली जाते. जगातील कोणत्याही भाषेत अशी सर्वसमावेशक प्रार्थना नाही. विश्वशांतीसाठी देवाची प्रार्थना त्यांनी पसायदानातून केली. विश्वात शांतता नांदावी यासाठी जे साहित्यनिर्मिती करतात, अशा साहित्यिकांना नोबेल पारितोषिक दिले जाते. तशी दहा नोबेल पारितोषिके केवळ पसायदानाच्या रचनेसाठी माऊलींच्या समाधीवर अर्पण करावीत, असे मला वाटते. अल्पवयातच प्रतिभासंपन्न असलेली ही चारी भावंडे महाराष्ट्र संस्कृतीचे तेज आहे.

**ज्ञानेशो भगवान् विष्णुः निवृत्तिर्भगवान हरः।**
**सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कलाः।।**

कार्तिक मासात शुद्ध एकादशीला पंढरपूर येथे यात्रा भरते व कृष्णपक्षातील एकादशीला ज्ञानेश्वरांची यात्रा आळंदी येथे भरते. कार्तिक वद्य त्रयोदशीच्या संजीवन समाधी सोहळ्यातील एका प्रसंगाचे वर्णन संत नामदेव करतात-

**ओसंडोनि निवृत्ति आलिंगो लागला।**
**आणिकांच्या डोळां अश्रु येती।।१।।**
**अमर्यादा कधी केली नाही येणे।**
**गुरुशिष्यपण सिद्धि गेले।।२।।**
**गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा।**
**गुह्यगौप्यमाळां लेवविल्या।।३।।**
**फेडिली डोळ्यांची अत्यंत पारणी।**
**आता ऐसे कोणी सखे नाही।।४।।**
**काढोनियां गुह्य देवे केले फोल।**
**आठवती बोल मनामाजी।।५।।**
**नामा म्हणे संत कासावीस सारे।**
**लाविती पदर डोळ्यांसी।।६।।**

**-नामदेव सदावर्ते**
पसायदान बंगला, मानकर मळा,
मखमलाबाद, नाशिक

***



## ज्ञानोबा, सांवतोबा, तुकोबांची दिवाळी

**माउली संत ज्ञानेश्वर, संतशिरोमणी सांवता माळी, जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची दिवाळी तर परतत्व स्पर्शाची! अलौकिकाचा ठाव घेणारी. आत्मारामाचा शोध घेणारी. आत्मदेवाचा साक्षात्कार अनुभवणारी. आत्मोद्धाराचा मार्ग शोधणारी. विठोमाउलीच्या परमोच्च सहवासाचे सद्भाग्य अनुभवणारी ही दीपावली. हा विलक्षण दीपोत्सव. माउली संत ज्ञानदेव, संत सावतामाळी आणि संत तुकाराम महाराज यांच्या प्रत्येकी एका अभंगाधारे हा दीपोत्सव समजून घेऊयात.**

**-डॉ. सुनील शिंदे**

**सं**तांची दीपावली अथवा दिवाळी संकल्पना ही कुतूहलाचा अन् अपार श्रद्धेचा विषय. ही दिवाळी अर्थातच परंपरागत लौकिक स्तरावरील मर्यादीत वर्तुळात फिरणारी नक्कीच नक्कीच नाही देवा! संतांच्या दीपावलीस अलौकिकाचा स्पर्श. संतांच्या दीपावलीस परमपावन सोहं साधनेची झळाळी. संतांची दीपावली तर माउली ज्ञानोबारायांच्या शब्दांत 'परम अनुभव नेमा..' अशी विलक्षण...

माउली संत ज्ञानेश्वर, संतशिरोमणी सांवता माळी, जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची दिवाळी तर परतत्व स्पर्शाची! अलौकिकाचा ठाव घेणारी. आत्मारामाचा शोध घेणारी. आत्मदेवाचा साक्षात्कार अनुभवणारी. आत्मोद्धाराचा मार्ग शोधणारी. विठोमाउलीच्या परमोच्च सहवासाचे सद्भाग्य अनुभवणारी ही दीपावली. हा विलक्षण दीपोत्सव. माउली संत ज्ञानदेव, संत सावतामाळी आणि संत तुकाराम महाराज यांच्या प्रत्येकी एका अभंगाधारे हा दीपोत्सव समजून घेऊयात.

दीपक अर्थात दीप-दिवा हा प्रकाशमान करणारा. भोवतालचा अंध:कार दूर करणारा. परिसर उजळून टाकणारा. अंतर्बाह्य दीप्ती प्रदान करणारा. तथापि, माउली ज्ञानदेव मात्र 'दीपकी दीपक मावळल्या ज्योती' असा विलक्षण आश्चर्यकारी दाखला देतात. 'घरभरी वाती शून्य झाल्या' असेही पुढे जाऊन सांगतात. ते कसे काय? या मावळणाऱ्या ज्योती कोणत्या? शून्य होणाऱ्या वाती तरी कोणत्या?

मनाची समतोल ठेवण का एकदा घडते तेव्हा विकार-उच्चार, लाभ-लाभावीण स्थिती गती, प्राप्ती-अप्राप्ती असा काहीच भेद मग उरत नाही. अज्ञानाचा अंधारु विनाश पावतो. दीप्ती-दीप-तेज-ज्योती यापलीकडे मनोवस्था स्थिराधार होते आणि मग हृदयीच्या 'घरी' शून्याधार असे निर्मोही स्वरुप साकारते देवा! वृत्तीची निवृत्ति अशावेळी फार फार निकडीची. हीच ती निर्मोही निर्विकार अवस्था. मूळ विचारधारा. वैकुंठीची अवस्था चतुर्भुज अर्थात भुजाधारी विस्तारते! परमानुभव तो असा प्रत्ययकारी.. क्षमाशील मन घडते. पावन मन आपसूकच घडून येते.. आणि मग माउली सांगतात :

'अरे अरे ज्ञाना झालासी पावन...!' अशी ही संस्मरणीय दिवाळी महाराज! संत ज्ञानदेवांच्या नेमक्या भावना त्या पुढीलप्रमाणे :

**दीपकी दीपक मावळल्या ज्योती। घरभरी वाती शून्य झाल्या।**
**वृत्तीची निवृत्ति आपणांसकट।**
**अवघेंची वैकुंठ चतुर्भूज। निवृत्ति परम अनुभवा नेमा।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**शांतिपूर्ण क्षमा ज्ञानदेवो। अरे अरे ज्ञाना झालासी पावन।**

माउलींची शांतीपूर्ण क्षमा अनुभूती ही अशी लोकविलक्षण, अद्‌भूत आहे. परमानुभव प्रदायी आहे, पावनाधार आहे.

संत शिरोमणी सांवतामाळी हे माउली संत ज्ञानोबारायांचे समकालीन आणि तत्कालीन अवघ्या संत मांदियाळीतील ज्येष्ठ भगवद्‌भक्त. मळा, मोटपाणी, पीकपाणी यांत रमलेले अन् त्यातच श्रीहरी विठोमाउली अनुभवणारे संतश्रेष्ठ. 'कांदामुळा भाजी अवघी विठाबाई माझी' असा सार्थ निर्वाळा देणारे. त्या वनमाळी विठोरायाला प्रेमभावनेने सदैव 'चित्ती' ठेवताना जो सुखाचा सोहळा घडेल, तीच तर माझी अनोखी दिवाळी, अशी रास्त ग्वाही-साक्ष सावतामाळी देतात. 'सुखाचा सोहळा करूनि दिवाळी' अशी ही त्यांच्याच शब्दांतील प्रगल्भ जाणीव आहे. साधनेचा, नामस्मरणाचा, चित्ती ठाव देण्याचा अविस्मरणीय जो भक्तिमार्ग-भक्तिपंथ धरावा, आचरावा अशी अपेक्षा सावतोबा करतात. भक्तिद्वार तिथेच खुले होईल. सुखाच्या सोहळ्याची अशी ही दिवाळी भगवंताला सदैव चित्ती धरण्यातच सामावलेली अशी शाश्वती सांवतोबा देतात. सावतामाळी यांच्याच शब्दांतील ही दीपावली पहा :

**सुखाचा सोहळा करूनी दिवाळी। प्रेमें वनमाळी चित्तीं धरुं।।**
**सावता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा। तेणें भक्तिद्वार वोळंगती।।**

अत्यंत मोजक्या, नेमक्या, अचूक शब्दांत संत सावतोबा उज्ज्वल दीपोत्सवी भावना व्यक्त करतात.

हितचिंतक, सखेसोबती, हरिभक्त भेटतील तोच आमचा दिवाळी-दसरा, अन्य औपचारिक दसरा दिवाळी एरवी आपणास ठाऊके नाही अशी परखड स्पष्टोक्ती संत तुकाराम महाराज देतात.

**'दिवाळी दसरा नाहीं आम्हा सण। सखे हरिजन भेटतांचि।'**

हाच तो जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांचा दाखला. रामनामे, भगवंताच्या नावे आमची वाचा कायमची 'विको दिली..' ही उत्कट आणि अतिउदात्त अशी तुकोबांची भावना. दुःख-दारिद्र्याची काय मातब्बरी नामसाधनेपुढे आणि भगवंताचे नामस्मरण करताना असा ठाम विश्वास तुकोबांचा. काळाची गतीही तटस्थ होत्साता स्थिरावते ही अपार श्रद्धा त्यांची... संतांच्या पायी जीव अर्पावा हीच श्रेष्ठ भावना.. यांपेक्षा काय असू शकते उतराई होणे असा सार्थ बाणा तुकोबांचा. काय आणि कसा आहे तो दसरा-दिवाळी सण संत तुकाराम महाराजांचा? पहा त्यांच्याच रोखठोक भाषेत :

**दिवाळी दसरा नाहीं आम्हा सण। सखे हरिजन भेटतांचि।।१।।**
**धन्य तो दिवस जाला सोनियाचा। विकली हे वाचा रामनामें।।२।।**
**दुःख तें दरिद्र गेलें हरपोनी। तटस्थ होऊनि काळ ठेला।।३।।**
**तुका म्हणे काय होऊं उतराई। जीव ठेवूं पायीं संताचिया।।४।।**

अशी ही काळजातली दिवाळी संत मंडळींची. माउली ज्ञानदेव, सांवतामाळी, संत तुकाराम महाराज यांची नामसाधनेची, कर्तव्यकर्माची ही दीपावली खऱ्या अर्थाने उत्कट आहे, समाधानाची आहे, परमपावन आहे.

**- डॉ . सुनील शिंदे**
'दत्त सुकृत', व्हेलेंसिया रेसेडेन्सी
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती साखर कारखाना रोड
अकोले : ४२२ ६०१, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२)

***



## ज्ञान तेजोमय दीपावली

संत साहित्यामध्ये दीपावलीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक एकात्मता आणि लोक समुदाय होय. संत साहित्यात एकतेचा संदेश दिसून येतो. जेथे दीपावलीचा सण सर्वांनी एकत्र येण्याचे, आनंद साजरा करण्याचे व एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचे प्रतीक आहे. अर्थात, दीपावली म्हणजे केवळ बाह्यप्रकाश नव्हे, तर अंतर्मनाच्या प्रकाशाकडे जाण्याचा एक उपक्रम आहे. संत साहित्यातील ही विचारधारा आजही प्रासंगिक आहे, कारण ती मानवतेच्या उज्ज्वल भवितव्याची आशा व्यक्त करते. त्यामुळे दीपावलीकडे फक्त सण म्हणून पाहू नये. दीपावली ही ज्ञानार्जनाचे पर्व आहे.

**- बंडोपंत कुलकर्णी**

**बा**लपण सर्वांनीच अनुभवले आहे. गावातील समोर अंगण असलेले घर, त्या अंगणात तुळशी वृंदावन, त्यात हिरवा शालू नेसून हसत डोलणारी तुळशी, तुळशीला साक्ष ठेवून येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत, असे विशाल हृदयाचे घर आणि घरातील लोक असे दृश्य गावातील प्रत्येक घराचे असे. तिन्ही सांजेच्या वेळी घरातील सर्व लहान मुलेबाळे यांना तुळशीजवळ एकत्र आणून तुळशीसमक्ष दिवा लावून तुळशी कट्ट्याजवळ बसवून

**शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा।**
**शत्रुबुद्धि विनाशाय, दीपज्योति नमोऽस्तुते।।**
**दिव्या दिव्या दीपत्कार,**
**कानीं कुंडलें मोतीहार।**
**दिव्याला पाहून नमस्कार।**
**दिवा लावला देवापाशी,**
**उजेड पडला तुळशीपाशी।**

ही प्रार्थना म्हणायला लावणारी आई वा आजी आजही आठवते. ही आठवण प्रत्येकाच्या स्मरणात आणि हृदयात घर करून असेल. संगणकीय तंत्रज्ञान येण्यापूर्वी आणि सनातन रीती-रीवाज परंपरा वाहणाऱ्या गाव-शहरांत ज्यांचा जन्म झाला त्यांनी नक्की वरील गोष्टी अनुभवल्या असतील. गेले ते दिवस, राहिल्या त्या आठवणी, अशी गत आज असली तरी, प्रकाशाचे महत्त्व आजही पूर्वीइतकेच आहे. किंबहुना उलट कृत्रिम बुद्धिमत्ता या गोष्टीमुळे ज्ञान, कारणपरत्वे प्रकाशाची व्याप्ती आणि व्याख्या वाढली आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

प्रकाशाशिवाय जीवन अशक्य आहे. जगाच्या पाठीवर विविध धर्म असून, त्या त्या धर्माचे अनुयायी त्यांच्या रूढी परंपरेप्रमाणे धर्माचरण करतात. येथे एक गोष्ट प्रकर्षाने नमूद करण्यासारखी आहे, ती म्हणजे प्रत्येक धर्मातील लोक आपला उत्साह, आनंद, जत्रा आणि सण हे लख्ख प्रकाश करून साजरा करतात. मग त्याला काही ठिकाणी दारू म्हणतात, काही ठिकाणी आतषबाजी म्हणतात आणि काही ठिकाणी बार उडविणे म्हणतात. जरी विविध नावाने प्रकाशाला ओळखले जात असले तरी त्यातील प्रकाश हा महत्त्वाचा आहे. कारण प्रकाश हे फक्त ज्ञानाचे प्रतीक नसून, ते उत्साह आणि आनंद याचे निदर्शक आहे.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आपल्या सनातन हिंदू धर्मात दिव्याचा सण म्हणून दिवाळी साजरी केली जाते. ज्याला दीपोत्सव असेही म्हणतात. या सणात फक्त आणि फक्त दिव्यांची पूजा होते. हा भारतीय सणांपैकी एक प्रमुख सण आहे. या सणात दीप हा प्रमुख असला तरी, उजेडाला धार्मिक अर्थ देत आणि त्या अनुशंगाने सांस्कृतिक परंपरांच्या माध्यमातून साजरा केला जातो. संत साहित्यात दीपावळीच्या महत्त्वावर अनेक विचार व्यक्त केले गेले आहेत. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंग रचनांसह इतर संतांच्या काव्यातही दीपावळीची एक विशेष जागा आहे. या संतांचा संदेश आपल्या जीवनात प्रकाश आणण्याचा आहे. दीपावली म्हणजे अंधकारातून प्रकाशाकडे जाणे. जेथे आत्मा आपली खोली आणि स्वच्छता साधतो. संत ज्ञानेश्वर यांच्या अभंगांमध्ये त्यांनी जीवनातल्या अंधाराला दूर करण्याची आणि ज्ञानाच्या प्रकाशात चलण्याची प्रेरणा दिली आहे.

**मी अविवेकाची काजळी।**
**फेडुनि विवेकदीप उजळी।**
**ते योगिया पाहे दिवाळी।**
**निरंतर।**

**अर्थ :** बुद्धीतील ज्ञान प्रकाशास आलेली अज्ञानरूप काजळी झाडून विवेक विचारांचा दिवा प्रज्वलित करतो. त्यावेळी योगी लोकांचे जीवन निरंतर आनंदमय, ज्ञानयुक्त दिवाळीसम असते. संत ज्ञानेश्वर हे ज्ञानेश्वरीमध्ये दीपावलीच्या संधीवर ज्ञान, भक्ती आणि प्रेमाची उपासना कशी करावी, हे सांगतात. ते दीपावलीला एक आध्यात्मिक पर्व म्हणून स्वीकारतात, जेथे भक्त आपल्या अंतर्मनात दीप प्रज्वलित करतो.

**जैसा मार्गेची चालता।**
**अपावो न पवे सर्वथा ।**
**का दीपाधारे वर्तता।**
**नाडळीजे।**

**अर्थ :** ज्याप्रमाणे योग्य मार्गाने चालले असता कधीही अपाय पोहोचत नाही किंवा दिव्याच्या उजेडात चालले असता अंधार अडखळू देत नाही. त्याप्रमाणे स्वधर्माने सर्व इच्छा पूर्ण होतात.

संत साहित्यामध्ये दीपावलीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सामाजिक एकात्मता आणि लोक समुदाय होय. संत साहित्यात एकतेचा संदेश दिसून येतो. जेथे दीपावलीचा सण सर्वांनी एकत्र येण्याचे, आनंद साजरा करण्याचे व एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचे प्रतीक आहे. अर्थात, दीपावली म्हणजे केवळ बाह्यप्रकाश नव्हे, तर अंतर्मनाच्या प्रकाशाकडे जाण्याचा एक उपक्रम आहे. संत साहित्यातील ही विचारधारा आजही प्रासंगिक आहे, कारण ती मानवतेच्या उज्ज्वल भवितव्याची आशा व्यक्त करते. त्यामुळे दीपावलीकडे फक्त सण म्हणून पाहू नये. दीपावली ही ज्ञानार्जनाचे पर्व आहे.

**जैसी दीपकळिका धाकुटी।**
**परी बहु तेजाते प्रगटी।**
**तैसी सद्बुद्धी हे थेकुटी।**
**म्हणो नये।**

**अर्थ :** ज्याप्रमाणे दिव्याची ज्योत धाकुटी म्हणजे लहान असते तरीही ती सर्वत्र प्रकाश पाडते. तशी मानवी मेंदूत नैतिक सुबुद्धी जरी अल्प वाटत असली तरी तिला लहान समजू नये.

ज्ञान हे ज्ञान असते. अज्ञान हा शब्द ज्ञान या शब्दाचा विरूद्ध वाटत असला तरी तो विरूद्ध नाही. कारण ज्ञान सर्व जीवात्म्यांच्या अंतरंगात सुप्तावस्थेत तुडुंब भरले आहे. त्याला जागे करून उजागर करणे हे ज्याच्या त्याच्या हाती आहे. मग ते ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग, कर्ममार्ग वा सांख्यमार्ग कोणत्या मार्गाने करायचे अगर

करायचे नाही, हे वैयक्तिक निश्चय, संकल्प आणि साधनेवर अवलंबून आहे. भरलेले आणि रिकामे हे एकमेकांविरुद्ध शब्द आहेत. कारण येथे पूर्णतः उलट दृश्य दिसते. ज्ञानाचे तसे नाही. कारण ज्याला अज्ञान म्हटले जाते त्याच्यात सुप्त अवस्थेत ज्ञान आहे. फक्त ते सुप्तावस्थेतील ज्ञान उजागर केले नाही म्हणून अज्ञान म्हणायचे का? सुप्तावस्थेतील ज्ञान उजागर न झालेल्या बुद्धीला अजाण अथवा अननुभवी म्हणता येईल. सूर्य मावळला म्हणून जगतात सूर्य नाही, असा अर्थ होत नाही. काही काळासाठी लुप्त होतो व सूर्य आपल्या धर्म साधनेत असल्याने पुन्हा उदयास येतो. तसे ज्ञान आहे. अज्ञान अवस्था म्हणजे ज्ञान लुप्त अवस्था होय.

**जैसी पूर्वदिशेच्या राऊळी।**
**उदया येताचि सूर्यदिवाळी।**
**की येरीहि दिशा तियेची काळी ।**
**काळिमा नाही।**

अर्थ : पूर्वदिशेला सूर्य उगवताच सदनी दररोज प्रकाशमय दिवाळीचा सण सुरू होतो. त्याचवेळी इतर दिशांचाही अंधार नाहिसा होतो. ज्यांच्या अंतःकरणवृत्तीत जीवब्रह्म अद्वैत ज्ञानाचा उदय होतो आणि त्याचा परिपाक जगत् ब्रह्मरुप अशा बोधामृत ज्ञान सागराने होते.

**येऱ्हवी तरी मी मुर्खु।**
**जरी जाहला अविवेकु।**
**तरी संतकृपा दीपकु।**
**सोज्वळू असे।**

अर्थ : जरी सहज सुकृत दर्शनी मी अज्ञानी व विवेकहीन वाटत असलो तरीही सोज्वळ संतकृपारुपी दीप माझ्या जीवनात नित्य तेवत आहे.

येथे संतकृपा दीप म्हणजे संतांनी मार्गदर्शन करून सुप्तावस्थेतील ज्ञानाला प्रकाशमय करण्याची साधना माझ्याकडून करून घेत आहेत आणि ते ज्ञान प्रज्वलीत होत आहे. ते नित्य असणार आहे. कारण ज्ञान चोख आहे.

**जैसा निर्वातीचा दीपु।**
**सर्वथा नेणे कंपु ।**
**तैसा स्थिरबुद्धी स्वस्वरुपु।**
**योगयुक्तु।**

अर्थ : ज्याप्रमाणे खेळती हवा नसलेल्या ठिकाणी असलेल्या दिव्याची ज्योत मुळीच हलत नाही, त्याप्रमाणे आत्मसाक्षात्कार ज्ञान योगयुक्त स्थिरबुद्धीने समाधीमध्ये निश्चलपणे रत असतो.

दीपावलीच्या सणाच्या माध्यमातून संत साहित्याने आपल्या जीवनात प्रेम, करुणा आणि सहिष्णुतेचा संदेश दिला आहे. हेच तत्वज्ञान आचरणात आणल्यास, आपले जीवन अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण होईल. म्हणून माऊलीचे पसायदान प्रत्येकाने वैयक्तिक पसायदान मानावे व परमात्म्याकडे मागणी करावी.

**माझ्यातील अज्ञान तिमिर संपवो**
**ज्ञानप्रकाशे मज स्वधर्म कळावो**
**माझे अदृश्य स्वरूप मजला लाहो**
**सार्थ सिद्ध दुर्लभ मनुष्य जन्म व्हावो**

**- बंडोपंत दि. कुलकर्णी**
जिल्हा व सत्र न्यायाधीश, पुणे

***



## आत्मस्वरूपाची ओळख

अश्विन मासातील दीप अमावास्या अर्थात दीपोत्सव सर्वांनाच हवाहवासा असतो. आनंदाची दिवाळी प्रकाशाने उजळून निघणारा दीपोत्सवाचा सण मनाला नवचैतन्य देऊन आत्मिक आनंद देतो. असा आत्मिक आनंद संत सहवासात संतांच्या आगमनाने जीवनात मिळतो. यास्तव म्हटले आहे. 'साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा'. आपल्या जीवनातील तिमिर दूर करून सुखाचा प्रकाश आणणारा हा दिवाळी सण पूर्वापार साजरा होत आहे.

**- बी. के. गायकवाड**

**स**र्व संत-महात्म्यांनी समस्त मानवहित, कल्याणाप्रित्यर्थ अखंड कार्य करीत आपला देह झिजवित आयुष्य खर्ची घातले. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास, संत नामदेव, संत एकनाथ, साईबाबा, गाडगे महाराज अशा अनेक संतांचे अनंत उपकार सर्व मानवावर आहेत.

या संतांचे आध्यात्मिक ग्रंथ अनुक्रमे ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, आत्मबोध, अभंग, एकनाथी भागवत यामधून ईश्वरभक्ती व ज्ञान या दृष्टीने बहुमोल मार्गदर्शन करण्यात आले आहे. जोपर्यंत सद्‌गुरुंची भेट होत नाही तोपर्यंत 'ग्रंथ हेच गुरू' म्हणून अभ्यासासोबत त्यातील संतांची शिकवण आचरणात आणावी.

सर्व संत एकमुखाने सांगतात 'मानव जन्मात आला आहात, तर जीवाचे सार्थक करून घ्या. स्वतःचे सत्य स्वरूप जाणून घ्या. अनेक योनींतून जन्म घेत हा बहुमूल्य मानव देह पूर्वसुकृतानुसार प्राप्त झालेला आहे. ईश्वराने मानवास विशेष सदसदविवेक बुद्धी दिली आहे. त्या बुद्धीद्वारे या मानवी देहाचे सत्य स्वरूप, मी कोण आहे? हे जाणून घेण्यासाठी हा जन्म आहे, हेच मानवाचे जीवन ध्येय आहे.

संतांच्या सांगण्यानुसार पंचमहाभूतात्मक या देहाची प्रकृती आणि मन, बुद्धी, अहंकार या अष्टदा प्रकृतीच्या या शरीरात ईश्वराचा हृदयस्थानी आत्मस्वरूपात निवास आहे. 'देह हे मंदिर आत आत्मा परमेश्वर'.

आत्मा हा परमात्म्याचा अंश आहे. जसा एकच सूर्य असंख्य किरणांनी प्रकाशतो. तद्‌वत एकमेव परमात्मा सर्व प्राणीमात्रांत, चराचरात. आत्मस्वरूपात सर्वांठायी आहे. चैतन्यमय संपूर्ण सृष्टी ही आत्म्याच्या आत्मतत्वाचा आविष्कार आहे.

प्रकृती माया बंधनामुळे जीवास त्याच्या नीज स्वरूपाचा, आत्म्याचा विसर पडला आहे. देह म्हणजे मी या धारणेत जीवनात जगत राहिला. देह विनाशी आहे. जन्म-मरण हे देहाचे होते. आत्मा अविनाशी, अमर आहे. जसा मनुष्य आपली जीर्ण, फाटकी वस्त्रे बदलतो आणि नवीन वस्त्रे परिधान करतो. तद्वत जीर्ण झालेले शरीर टाकून आत्मा नवीन देह धारण करतो. हे जन्म-मरण चक्र चालू असते.

मी म्हणजे एक देही आहे, ही आजवरची अनेक जन्मांमुळे झालेली दृढ देहबुद्धी दूर होण्यासाठी, तिचे निरसन होऊन आत्मबुद्धी होण्यासाठी संत सहवास प्राप्त झाला पाहिजे.

**'देह बुद्धी ती आत्मबुद्धी करावी।**
**सदा संगती सज्जनाची धरावी।।१६३।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

(मनाचे श्लोक, समर्थ श्री रामदास स्वामी)

आत्मज्ञान हे सर्वश्रेष्ठ ज्ञान आहे. आत्मज्ञान प्राप्तीसाठी मनुष्याने सर्वार्थाने सर्वभावे संतचरणी शरण जावे. संतचरणी विनम्रभावे लीन झाल्याने संत सहवास व सत्संगतीत मुमुक्षू भक्ताची सद्‌गुरुंशी भेट होते. ही भेट जीवाला ईश्वरभक्तीत ओढ लागण्यासाठी आणि पारमार्थिकदृष्ट्या आत्मोन्नतीसाठी महत्त्वाची आहे.

मानवी देह हा सत्व, रज, तम या प्रकृतीच्या त्रिगुणांनी बद्ध आहे. देहातील इंद्रियांद्वारे मनातील इच्छा, वासना यांच्या पूर्ततेसाठी शरीराकडून सतत कर्म होत असते. जड देहाकडून मन इंद्रियांद्वारे झालेले कर्म सात्विक, राजस व तामस या गुणवृत्तीनुसार होते. केलेल्या 'कर्माचे तयाचे फलस्वरूप इष्ट-अनिष्ट परिणाम देहाचे भोग सुख दुःख भोगणे हे देहाला अनिवार्य असते.

**'मना रे तू पूर्व संचित केले**

**तयासारखे भोगणे प्राप्त झाले'** -श्री समर्थ रामदास स्वामी

जैसे त्याचे कर्म, तैसे त्याचे आर्जव व जिवात्म्याला देहबुद्धीत गुंतल्याने पुनरपी जन्म, पुनरपी मरण या फेऱ्यातून मुक्त न झाल्याने प्रकृती मायेत, कर्म बंधनात जीवात्म्यास अडकून रहावे लागते.

जगी देणारे-घेणारे हे मनुष्याचे कर्मच असते. यासाठी संत नेहमी सांगतात, कर्म सावधपणे करावे. सात्विक, परोपकारी सत्कर्म मनुष्याला परमार्थात सहाय्यभूत होतात. जीवनात सर्वसाधारणतः देहाचे अनुषंगाने देहाला सुखी ठेवण्यासाठी आपण आयुष्यभर कष्ट करीत जीवन जगतो आणि देहातील आत्मा शाश्वत आत्मसुखापासून वंचित राहतो. संत आपली प्रपंचातील आसक्ती कमी करतात.

समर्थ रामदास स्वामी मनाचे प्रबोधन करताना सांगतात.

**'मना सज्जना एक जीवी धरावे।**
**जनी आपुले हीत तुवा करावे।।**
**रघुनायकाविण बोलू नको रे ।**
**सदा मानसी तो निजध्यास राहो ।।'**
**- मनाचे श्लोक, श्री समर्थ रामदास स्वामी**

**'मन एवं मनुष्याणां कारण बन्ध मोक्षयोः।**

मनाची शांती, स्थैर्य, निर्मलता याकरिता संतसंगतीचे महत्व अनन्यसाधारण आहे. जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज परमेश्वर चरणी मागणे मागतात -

**'नलगे मुक्ती आणि संपदा, संत संग देई सदा'**

संत सहवासात मनुष्याला त्याच्या प्रकृती स्वभावानुसार संतांकडून चांगल्या गुणांची शिकवण मिळून संस्कार होतात. हे संस्कार त्याच्या पारमार्थिक जीवनात जीवनशिदोरी म्हणून उपयुक्त ठरतात.

अश्विन मासातील दीप अमावास्या अर्थात दीपोत्सव सर्वांनाच हवाहवासा असतो. आनंदाची दिवाळी प्रकाशाने उजळून निघणारा दीपोत्सवाचा सण मनाला नवचैतन्य देऊन आत्मिक आनंद देतो. असा आत्मिक आनंद संत सहवासात संतांच्या आगमनाने जीवनात मिळतो. यास्तव म्हटले आहे.

**'साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा'.**

आपल्या जीवनातील तिमिर दूर करून सुखाचा प्रकाश आणणारा हा दिवाळी सण पूर्वापार साजरा होत आहे.

नृसिंह सरस्वती यांना एका दीपावली सणात त्यांच्या परमप्रिय सात भक्तांनी दिवाळी सणानिमित्त आपल्या घरी येण्याचे निमंत्रण दिले. या खेरीज संगमावरील भक्त दिवाळी येथेच मठात साजरी करावी

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

असे विनविले. त्यांनी सर्वांच्या आनंदासाठी एकाच वेळी अष्टरुपे धारण केली व दिवाळीला सर्वत्र जाऊन त्यांचे समाधान केले.

ईश्वराप्रती निष्ठापूर्वक निरपेक्ष भक्ती जीवाचा उद्धार करते. भक्तिमार्गात महर्षी नारदांनी सांगितलेल्या नवविद्या भक्तीत नामस्मरण, कीर्तन, श्रवण, भजन, अर्चना, पादसेवन, आत्मनिवेदन भक्ती भगवंतास, सद्‌गुरुचरणी समर्पित करता येते. श्रद्धेने अंतःकरणपूर्वक केलेले भगवंताचे नामस्मरण जीवाला आत्मसन्मुख करून ईश्वराचे समीप नेते. जीवात्मा आणि आत्मा एकच आहेत. या संदर्भाने प्रत्यक्ष भगवंत परमात्मा श्रीकृष्ण देव त्याचा परमभक्त अर्जुन यास सांगतात, अनन्यभावे भक्तियुक्त अंतःकरणाने मला शरण येणाऱ्या भक्तांचे योगक्षेम मी वाहतो. निर्मल अंतःकरणाने केलेल्या गुरुभक्तीतून भक्ताची आत्मोन्नती होते. सद्‌गुरुंना अनन्यभावे शरण जावे. गुरुआज्ञेचे पालन करावे. त्याला जीवनात दैवी गुण, संपदा, दया, क्षमा, शांती, औदार्य व तेज याची प्राप्ती होते. सद्‌गुरु माऊली म्हणतात जीवनात आपण सर्व कार्य देहाच्या सुखाच्या अनुषंगाने करीत राहतो आणि देहात जो आत्माराम वसलेला आहे त्याला विसरून जातो.

आपला आत्मा हेच आपले सत्य निजस्वरूप आहे. आत्मा अमर, अविनाशी, निर्गुण, निराकार आहे. तो मूळचा आनंदस्वरूप आहे. शाश्वत सुखासाठी आत्मानंद प्राप्तीसाठी मुमुक्षू भक्तांनी तळमळीने मन-चित्त स्थिर करून सद्‌गुरुंना अनन्यभावे शरण जावे. आपले निजस्वरूप आत्मा जाणण्यासाठी आपल्या हृदयमंदिरी सगुणस्वरूप सद्‌गुरुंचे ध्यानाद्वारे आत्मचिंतन करावे. गुरुकृपेने आत्मज्ञान होऊन आत्मदर्शन होईल आणि मग जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत याची आत्मप्रचीती येईल. संत ज्ञानेश्वर माऊली सांगतात-

**ज्ञानदेवा प्रमाण, आत्मा हा निधान।**
**सर्वांघटी पूर्ण एक नांदे।।**

**सर्वांभूती एकच परमात्मा आत्मरूपात आहे. आत्म्यावर प्रेम करा. ध्यान करा, ध्यानी बना.**

**- बी. के. गायकवाड**
प्लॉट क्र. ५, नवमहाराष्ट्र को. ऑप. हाउंसिंग सोसायटी,
पुणे-सातारा रोड, पुणे - ०९.
मो. नं. ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## दीपावली : मधुर संयोगों का आनन्दोत्सव

**दीपावली त्योहार बुराई पर अच्छाई की जीत का प्रतीक है। यह ज्ञान के प्रकाश से आंतरिक दीपों को जलाने का समय है ताकि अंधकार को दूर किया जा सके और आंतरिक चमक चमक सके। सद्‌गुरु कहते हैं, अंधकार अज्ञानता का रूपक है और प्रकाश ज्ञान का प्रतिनिधित्व करता है। हमारे जीवन में सद्गुरु के आगमन से ही अंधकार दूर होता है। अपने जीवन में सद्‌गुरु को आमंत्रित करने के लिए हमें बार-बार ये बातें दोहरानी चाहिए-हे नाथ! मैं तुम्हें भूलूंगा नही।हे नाथ, मैं आपका हूँ, आप मेरे हैं।**

**- नीता एवं नरेश यादव**

दीपावली-सबसे शुभ और महत्वपूर्ण त्योहारों में से एक है जिसे रोशनी का त्योहार भी कहा जाता है। दीपावली मनाने के कई कारणों की मान्यता है , यथा

**श्री राम का वनवास से लौटना,**
**विष्णु और लक्ष्मी विवाह, लक्ष्मी अवतरण**
**कृष्ण द्वारा नरकासुर वध,**
**श्री महावीर परिनिर्वाण इत्यादि।**

ग्रंथों में विष्णु और लक्ष्मी का विवरण दीपप्रतिपदोत्सव-सातवीं शताब्दी का संस्कृत नाटक-नागानंद द्वारा विरचित, इसमें नव विवाहित जोड़ों को उपहार दिया जाता था और विष्णु लक्ष्मी की याद में दीये जलाये जाते थे।

दीपमालिका : नौवीं शताब्दी में संस्कृत कवि राजशेखर द्वारा विरचित काव्य मीमांसा में विवरण-घर और खेत खलिहान की साफ़ सफाई और दीयों द्वारा सजावट का विवरण मिलता है, इत्यादि।

यह भी मान्यता है कि, धन तेरस के दिन समुद्र मंथन के पश्चात देवी लक्ष्मी धन्वंतरि के साथ प्रकट हुईं। इस मान्यता के अनुसार भी लक्ष्मी पूजन की जाती है। और प्रणाम कर विनती की जाती है

**सर्वज्ञे सर्ववरदे सर्वदुष्टभयंकरि।**
**सर्वदुःखहरे देवि महालक्ष्मि नमोऽस्तुते ।।**

अर्थात्

हे सर्वज्ञ, सर्व-हितकारी, सर्व-बुराई-भीरू! हे देवी महालक्ष्मी सभी कष्टों को दूर करने वाली, मैं आपको प्रणाम करता हूं।

यह त्योहार बुराई पर अच्छाई की जीत का प्रतीक है। यह ज्ञान के प्रकाश से आंतरिक दीपों को जलाने का समय है ताकि अंधकार को दूर किया जा सके और आंतरिक चमक चमक सके।

सद्‌गुरु कहते हैं, अंधकार अज्ञानता का रूपक है और प्रकाश ज्ञान का प्रतिनिधित्व करता है। हमारे जीवन में सद्‌गुरु के आगमन से ही अंधकार दूर होता है। अपने जीवन में सद्‌गुरु को आमंत्रित करने के लिए हमें बार-बार ये बातें दोहरानी चाहिए-

हे नाथ ! मैं तुम्हें भूलूंगा नहीं !

हे नाथ ! मैं आपका हूँ, आप मेरे हैं !

साथ ही, दीये जलाना हमारे जीवन में नकारात्मक शक्तियों के नाश का प्रतीक है, जैसे हिंसा, क्रोध,

भय, पीड़ा आदि। केवल एक आध्यात्मिक गुरु ही हमारे भीतर के दीयों को जलाने में हमारी मदद कर सकता है, ताकि हम जीवन के पथ पर हर कदम रोशन होकर चलें। इसका उद्देश्य केवल दीयों की रोशनी या आतिशबाजी की चमक का महिमा मंडन करना नहीं है, बल्कि ईश्वर की कृपा का महिमा मंडन करना है, उन्हें धन्यवाद देना और उनके आशीर्वाद के लिए प्रार्थना करना है। कहा गया है -

**दीपज्योतिः परंब्रह्म दीपज्योतिर्जनार्दनः।**
**दीपो हरतु मे पापं दीपज्योतिर्नमोऽस्तु ते।।**

अर्थात्

दीपक का प्रकाश ही पर ब्रह्म है, दीपक का प्रकाश ही जनार्दन है। दीपक मेरे पापों को दूर कर दे, हे दीपक के प्रकाश, मैं आपको प्रणाम करता हूँ।

अतः इस दीपावली पर हम संकल्प लें कि सद्गुरु के नाम का दीपक जलाएंगे, उसे अपने हृदय मंदिर में रखेंगे और उसमें भक्ति का तेल डालेंगे। मिट्टी के दीये हमारे घरों को कुछ घंटों के लिए रोशन कर सकते हैं, लेकिन सद्गुरु के प्रेम और स्मरण से बना यह दीपक हमारे जीवन को हमेशा के लिए रोशन कर देगा, हमारे हजारों पिछले जन्मों के अंधकार को मिटा देगा।

दीपावली का अध्यात्मिक महत्व भी अत्यधिक है। इसे आत्म-ज्ञान, आत्म-विकास और प्रकाश का पर्व माना जाता है, तथा जैसा कि उपरोक्त भी वर्णित है की हिन्दू धर्म में इसे देवी लक्ष्मी की पूजा के रूप में मनाने की परंपरा है, क्योंकि लक्ष्मी जी धन, संपत्ति, समृद्धि और सफलता की प्रतीक हैं और उनकी पूजा से मानव जीवन में सुख-शांति की प्राप्ति होती है।

हम पीढ़ीयों से जान भी रहे हैं और समझ भी रहे है, पर क्या केवल यही दीवाली है? वास्तव में अब सद्गुरु सानिध्य में इसका दर्शन अलग ही महसूस होता है, अतः गुरुदेव की प्रेरणा बता रही है कि-
मन की अयोध्या में आत्मा रामजी विराजें तो दीवाली है,

**माटी-शरीर के दीपक में सांसों की बाती,**
**प्रेम की ज्योत आत्मा में प्रज्वलित हो, तो दीवाली है,**
**दीप से दीप मिलकर, चिराग तले भी उजाला हो,**
**तो दीवाली है, प्रेम में त्याग की तपिश से,**
**रोशन ये आलम सारा हो, तो दीवाली है।।**

इस प्रकार से यह त्योहार कई मधुर संयोगों का आत्मोत्सव है, इसलिए यह मानव जीवन में नए संकल्पों के लिए प्रेरणा प्रदान करता है, यह तब और वास्तविक जीवन उत्सव बन जाता है जब हम सद्गुरु सानिध्य को याद रख गुरुमंत्र जपते हुए ईश्वर से प्रार्थना करते हैं कि सबको जागृति प्राप्त हो, सब सुखी हो पाएं, प्रसन्न रहे सबकी प्रसन्नता का कारण बने, इस जीवन में आने का मकसद सभी का पूरा हो - इसी भावना से हमारे हृदय कमल पर जो आत्म दीप प्रज्वलित होगा-यही दीपक और इन मधुर संयोगों का आनन्दोत्सव, हमारे जीवन सर्वदा दीपावली जैसा प्रकाश भर देगा, शुभ दीपावलिः - दीपावली की हार्दिक शुभकामनाएं। आत्मा मालिक

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःख भाग्भवेत्।

**-नीता एवम् नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

|| आत्मा मालिक ||



घेऊनी दिव्यांचा प्रकाश सोनेरी, माळोनी गंध मधुर उटण्याचा...
करा संकल्प सुंदर जगण्याचा, गाठूनी मुहूर्त दिवाळीच्या सणाचा...

**आपणास व आपल्या परिवारास**

# दीपावली

**निमित्त**

## मंगलमय शुभेच्छा!




• शुभेच्छुक •

## आत्मा मालिक ध्यान योग मिशन,कोकमठाण

**आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण**

✻ प्रेषक ✻

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी–कोपरगांव रोड,

ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)–४२३६०१